डॉ. अविनाश ढाकणे, भाप्रसे
सदस्य सचिव
Dr. Avinash Dhakne, IAS
MEMBER SECRETARY

महाराष्ट्र
"Your Service is our Duty"

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

**क्र. मप्रनि/ ससं (जप्रनि)/ २५०८१८-एफटीएस-०३०४** **दिनांक : १८.०८.२०२५.**

प्रति,
श्री.संचालक,
नगरपालिका प्रशासन संचालनालय,
७ वा मजला, बेलापूर भवन,
सेक्टर-११, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई-४००६१४.

विषय :- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मूर्ती विसर्जनाबाबत तयार केलेली मानक कार्यपध्दतीबाबत ... (Standard Operating Procedure – SOP - for Idol immersion)..

संदर्भ : १. मा.उच्च न्यायालयाने (मुंबई) याचिका क्र. ९६/ २०२४ च्या अनुषंगाने, दि.२४.०७.२०२५.
२. दि.०१.०८.२०२५ रोजीच्या शासननिर्णयाप्रमाणे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पीओपीच्या मूर्तीबाबत तयार केलेल्या मार्गदर्शक सूचना.

महोदय,

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. ९६/ २०२४ च्या अनुषंगाने, दि.०९.०६.२०२५ व दि.२४.०७.२०२५ रोजी Plaster of Paris (PoP) मूर्ती विसर्जनाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र शासनाने निर्गमित केल्या आहेत. त्यातील मुद्दा क्र. १७ च्या अनुषंगाने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मूर्ती विसर्जनाबाबत मानक कार्यपध्दती (Standard Operating Procedure - SOP) तयार केल्या असून त्याची प्रत आपल्या माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. आपणांस विनंती करण्यात येते की, राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत आपल्या संचालनालयामार्फत कळविण्यात यावे.

आपला,

(स्वाक्षरी)

**(डॉ.अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)**
**सदस्य सचिव**

सोबत : एसओपी व सहपत्र-१.

प्रत सविनय सादर,
१. मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
२. मा.सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

## Plaster of Paris (PoP) मूर्ती विसर्जनासंदर्भात - मानक कार्यपद्धती

## (Standard Operating Procedure - SOP)

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. ९६/ २०२४ च्या अनुषंगाने, दि.०९.०६.२०२५ व दि.२४.०७.२०२५ रोजी Plaster of Paris (PoP) मूर्ती विसर्जनाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र शासनाने निर्गमित केल्या आहेत. त्यातील मुद्दा क्र. १७ च्या अनुषंगाने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मूर्ती विसर्जनाबाबत तयार केलेली मानक कार्यपध्दती (Standard Operating Procedure - SOP) खालीलप्रमाणे आहे.

**१. नोंदवही ठेवणे :** मूर्ती विसर्जनाच्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्था नोंदवही ठेवतील. या नोंदवहीत नागरिकांनी व सार्वजनिक मंडळांना मूर्ती विसर्जनाबाबत माहिती देणे बंधनकारक असेल. सदर नोंदवही **सहपत्र-१** प्रमाणे असेल.

**२. सार्वजनिक मंडळांची नोंदणी :** स्थानिक स्वराज्य संस्था स्वतंत्र कक्ष स्थापन करून मंडळांच्या मूर्तींची माहिती संकलित करतील व त्यानुसार विसर्जन आराखडा तयार करतील.

**३. घरगुती आणि लहान मूर्ती विसर्जन :** विविध ठिकाणी योग्य आकाराचे कृत्रिम तलाव तयार करावेत. घरगुती व सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या PoP मूर्ती केवळ कृत्रिम तलावातच विसर्जित कराव्यात. यावर देखरेख स्थानिक स्वराज्य संस्था करतील. सहा फुटापेक्षा कमी उंची असलेल्या पीओपी मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतात होणार नाही, याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांनी घ्यावी.

**४. ६ फुटांपेक्षा मोठ्या मूर्तींचे नैसर्गिक स्त्रोतांत विसर्जन :** इतर पर्याय उपलब्ध नसल्यास मोठ्या मूर्ती नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जित केल्या जाऊ शकतात, मात्र दुसऱ्या दिवशी स्वच्छता व संकलन करणे अनिवार्य असेल. मूर्तीचे पुर्नवापर / पुनर्प्रक्रिया सुनिश्चित करण्यात यावी.

**५. निर्माल्य व्यवस्थापन :** कृत्रिम तलावाजवळ स्वतंत्र निर्माल्य संकलनाची सोय करावी. संकलित निर्माल्याचा पर्यावरणपूरक पुनर्वापर / प्रक्रिया करावी.

**६. तलावातील पाण्याचे व्यवस्थापन :** कृत्रिम तलावातील पाणी मूर्तीच्या क्षमतेपेक्षा ८-१० पट असावे. विसर्जनानंतर ७ दिवसात पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांपासून दूर विसर्ग करावा.

**७. तलावातील गाळ व्यवस्थापन :** गाळ १५ दिवसांपर्यंत पर्यावरणपूरक पद्धतीने साठवून त्याचा पुनर्वापर/पुर्ननिर्मितीसाठी वापर करावा.

**८. NGO व पर्यावरण संस्था यांच्याशी करार :** PoP मूर्तींच्या पुनर्वापर व पुनर्प्रक्रियेबाबत एनजीओ व पर्यावरण संस्थांशी करारनामा करावा. त्यात CPCB च्या मार्गदर्शक सूचनांचा समावेश असावा.

**९. वैज्ञानिक संस्था यांच्याशी सहकार्य :** नॅशनल केमिकल लेबॉरेटरी (NCL), पुणे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग (RGSTC), मुंबई इ. संस्थांशी करार करून त्यांचे मार्गदर्शन घेऊन गाळ व पाण्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करावी.

**१०. अंमलबजावणी व न्यायालयीन पालन :** सर्व स्थानिक स्वराज्य संस्था उपरोक्त सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करतील. तसेच, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन सुनिश्चित करतील.

- - - - - - - - - -

## सहपत्र-१

| Sr. No. | | POP Idols in year 2025 (पि ओ पि च्या विसर्जन केलेल्या मूर्तींची संख्या ) | | | No. of ecofriendly idols less than 6 feet height which are immersed in Artificial Pond in the year 2025<br><br>(०६ फुटा पेक्षा कमी उंची असलेल्या पर्यावरणपुरक मूर्ती - कृत्रिम तलावात विसर्जन केलेल्या मूर्तींची संख्या (वर्ष २०२५) | No. of ecofriendly idols more than 6 feet height which are immersed in Natural Water Bodies in the year 2025<br><br>०६ फुटा पेक्षा जास्त उंची असलेल्याय पर्यावरणपुरक मूर्ती- नैसर्गिक जल स्त्रोतात विसर्जन केलेल्या मूर्तींची संख्या (वर्ष २०२५) | Total Number of ecofriendly idols immersed in year 2025<br><br>( पर्यावरणपुरक मूर्तींची विर्सजन केलेली एकूण संख्या (वर्ष २०२५) | Total POP & Non-POP idols immersed in 2025.<br><br>(पि ओ पि आणि पर्यावरणपुरक मूर्तींची विर्सजन केलेल्या मूर्तींची एकूण संख्या ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | POP Idols (पि ओ पि च्या मूर्तींची एकूण संख्या ) | | | पर्यावरणपुरक मूर्ती - विसर्जित मूर्तींची एकूण संख्या (वर्ष २०२५) | | | |
| | | 0 to 6 feet ht (immersed in Artificial tank) | more than 06 feet (immersed in Natural Water body) | Total Number of POP idols immersed | 0 to 6 feet ht (immersed in Artificial tank) | Above 6 feet (immersed in Natural water body) | Total | Grand Total (2025) |
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| Total | | | | | | | | |